**गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..**

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक २१३ वा ● शनिवार २३ डिसेंबर २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 213 | Date : 23/12/2023 | blow :Saturday | Page 4 | Price 4

## केंद्र सरकारविरोधात सर्व विरोधक एकत्र



नवी दिल्ली : संसदेत खासदारांच्या निलंबनाचे पडसाद आज राजधानीतील जंतरमंतरवर बघायला मिळाले. केंद्र सरकारच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी सर्वच विरोधक एकत्र आले होते. बेरोजगारी, वाढती महागाई आणि संसदेतील घुसखोरी प्रकरणाकडे लक्ष वेधण्यासाठी विरोधकांनी तीव्र आंदोलन केले.

संसदेतील विरोधी खासदारांच्या निलंबनाविरोधात शुक्रवारी 'इंडिया' आघाडीतील घटकपक्ष जंतरमंतर येथे जमले. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, राहुल गांधी, राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार, सीताराम येचुरी, शशी थरूर यांच्यासह विरोधी पक्षांचे अनेक नेते

'लोकशाही वाचवा' आंदोलनात उपस्थित होते. खासदारांच्या निलंबनाविरोधात 'इंडिया' आघाडीने पक्ष कार्यकर्त्यांना देशभरात आंदोलन करण्यास सांगितले आहे. संसदेतील सुरक्षेतील त्रुटींबाबत राहुल गांधी म्हणाले की, जे लोक स्वतःला देशभक्त म्हणवून घेतात त्यांची हवाच गेली आहे. काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे म्हणाले की, मोदी-शहा यांनी संविधान आणि लोकशाही नष्ट करण्याचा डाव आखला आहे.

## राज्यात हुडहुडी! थंडीचा कडाका वाढल्याने शेकोटीचा आधार



राज्यात सध्या थंडीचा कडाका वाढल्याने लोक शेकोटीचा आधार घेत आहे. पुढील काही दिवसांत तापमान वाढण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, २५ डिसेंबर दरम्यान तापमानात किंचित वाढ होईल त्यानंतर डिसेंबरच्या शेवटच्या काही दिवसांत पुन्हा थंडीची लाट पाहायला मिळणार आहे.

मुंबई : राज्यासह देशात थंडीचा कडाका वाढला आहे. एकीकडे दक्षिण भारतात मुसळधार पावसाचा जोर पाहायला मिळत असून उत्तर भारतात थंडीची लाट (उेश्रव थरींश) पसरली आहे. मैदानी प्रदेशातून वाहणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे महाराष्ट्रातील (चरहरीरीहींर थशरींहशी ऋीशलरीीं) तापमानातही कमालीची घट झाली आहे.

राज्यात आठवडाभर कोरडं वातावरण राहणार असून हवेत कमालीचा गारवा जाणवेल. जळगाव जिल्ह्यात सध्या थंडीची लाट सुरू आहे. जळगावमध्ये तापमान १० अंशापर्यंत खाली घसरलं आहे. थंडीपासून बचाव करण्यासाठी अनेकांनी उबदार कपड्यांसह शेकोटीचा आधार घेण्यास सुरुवात केली आहे. । पान २ वर

## काँग्रेस नेते सुनिल केदार यांना मोठा धक्का, नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणी दोषी



मुंबई : काँग्रसचे नेते आणि माजी मंत्री सुनिल केदार यांना कार्टानं मोठा धक्का दिला आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १५० कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणी केदार यांना दोषी ठरवलं आहे. कोर्टानं सुनील केदार( तत्कालीन बँक अध्यक्ष), केतन शेठ (मुख्य रोखे दलाल), अशोक चौधरी (तत्कालीन बँक मॅनेजर) या तिघांसह आणखी तिघे रोखे दलाल । पान २ वर

## 'जे एन-१'ला घाबरू नका, सतर्क रहा : आरोग्यमंत्री डॉ. तानाजी सावंत




मुंबई : राज्यात कोरोनाच्या 'जेएन-१' या नवीन व्हेरियंटचे रुग्ण आढळले असले, तरी नागरिकांनी घाबरून न जाता कोविड अनुरूप वर्तणुकीचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री डॉ. तानाजी सावंत यांनी केले आहे.

'जेएन-१' साठी आरोग्य यंत्रणा सज्ज असून, संशयित रुग्णांच्या चाचण्या वाढविण्याचे, त्यांचे सर्वेक्षण अधिक सक्षम करण्याचे आणि त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करण्याचे त्याचप्रमाणे जिल्हा स्तरावर रुग्णालयांतील यंत्रणेचे गांभीर्याने मॉकड्रिल करून तीन दिवसांत याविषयीचा अहवाल सादर करण्याचे असे निर्देश प्रा. डॉ. सावंत यांनी आरोग्य विभागाला दिले आहेत.

'जेएन-१' या नवीन व्हेरियंटच्या वाढत्या रुग्णसंख्येच्या पार्श्र्वभूमीवर डॉ. सावंत यांनी आरोग्य विभागाच्या तयारीचा पुणे येथे आढावा घेतला. आरोग्य विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानचे संचालक धीरज कुमार, सर्व जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महापालिकांचे आयुक्त, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच आरोग्य विभागाचे सर्व प्रमुख अधिकारी बैठकीला । पान २ वर

## सरसकट आरक्षणावर ठाम, सरकारकडे आता उद्याचा दिवस; मनोज जरांगेंचा सभेपूर्वी सरकारला इशारा



बीड : मराठा आरक्षणाची २४ डिसेंबरनंतरची पुढील दिशा काय असणार यासाठी आज बीडमध्ये मनोज जरांगे यांची सभा होत आहे. या सभेपूर्वी मनोज जरांगे यांनी बीड शहरात पत्रकार परिषद घेत पुन्हा एकदा सरकारला इशारा दिला आहे. सरसकट आरक्षणावर आम्ही ठाम असून, सरकारकडे आज आणि उद्याचा दिवस आहे. बाकी सर्व माहिती आजच्या सभेत सांगणार असल्याचं जरांगे म्हणाले आहे.

यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, किती दिवस आम्हाला आरक्षणासाठी झुलवत ठेवणार. आजच्या सभेत सर्वकाही सांगणार आहे. संयम किती दिवस पाळायचा आम्हालाही मर्यादा आहे. सरकारच्या हातात आजचा आणि उद्याचा दिवस आहे. सरकारने लिहिलेले शब्द सरकार पाळत नाही. आजच्या सभेतून मराठा समाजासमोर सर्व सत्य मांडणार आहे. मराठा समाजाने आणखी किती दिवस अन्याय सहन करायचा. महाराष्ट्रातील मराठा समाजाला सरसकट आरक्षण देण्याची मागणी आमची आहे. कायद्याच्या चौकटीत राहूनच आम्ही आरक्षण मागत आहोत, असे जरांगे म्हणाले.

## भारतात परकीय गुंतवणूक वाढली

नवी दिल्ली : परकीय चलनाच्या गंगाजळीत मोठी वाढ झाली आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीनुसार, १५ डिसेंबरला संपलेल्या आठवड्यात परकीय गुंतवणुकीतील वाढीमुळे, परकीय चलन साठा ९.११ अब्ज डॉलरने वाढून ६१५.९७ अब्ज डॉलर झाला आहे. हा साठा मागील आठवड्यात ६०६.८५ अब्ज डॉलर होता. भारतीय रिझर्व्ह बँकेने शुक्रवारी परकीय चलनाच्या साठ्याचा डेटा जाहीर केला आहे. १५ डिसेंबर रोजी संपलेल्या आठवड्यात परकीय चलनाच्या मालमत्तेत वाढ झाली .

## कर्नाटकमधील हिजाबवरील बंदी हटवणार, मुख्यमंत्री सिद्धरामय्यांची मोठी घोषणा

कर्नाटक : कर्नाटकमधील काँग्रेस सरकार राज्यात लागू केलेली हिजाबवरील बंदी उठवणार आहे. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हिजाबवरील बंद उठवण्याच्या सूचना दिल्या आहेत. या सूचना देताना सिद्धरामय्या म्हणाले, प्रत्येकाला त्याच्या आवडीचे कपडे परिधान करण्याचा अधिकार आहे. याआधीच्या बसवराज बोम्मई सरकारने कर्नाटकमधील शाळा आणि महाविद्यालयांमध्ये हिजाब परिधान करण्यास बंदी घातली होती. परंतु, सिद्धरामय्या यांनी संबंधित अधिकाऱ्यांना ही बंदी उठवण्याचे निर्देश दिले आहेत. हिजाबवरील बंदी उठवण्याचा निर्णय जाहीर करत मुख्यमंत्री सिद्धरामय्या म्हणाले, प्रत्येकाला आपल्या आवडीनुसार कपडे परिधान



करण्याचा अधिकार आहे. पंतप्रधान मोदी यांचा 'सबका साथ सबका विकास' (सर्वांची साथ, सर्वांचा विकास) ही घोषणा फसवी आहे. भाजपा कपड्यांवरून आणि जातीपातींवरून समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे.

यावर्षी ऑक्टोबर महिन्यात स्पर्धा परीक्षांमध्ये मुस्लीम विद्यार्थींनीना हिजाब घालण्यास कर्नाटक सरकारने परवानगी दिली होती. भारत हा धर्मनिरपेक्ष देश आहे. त्यामुळे लोकांना हवे तसे कपडे घालण्याचं स्वातंत्र्य आहे, असं म्हणत कर्नाटकचे उच्च शिक्षण मंत्री एम. सी. सुधाकर यांनी हिजाब परिधान करण्यास परवानगी । पान २ वर

## आचेगांव ग्रामदैवत श्री शावरसिद्ध देवस्थान वतीने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार



आचेगांव/बलवान गोतसुर्वे : अक्कलकोट तालुक्याचे पाणीदार, लोकप्रिय आमदार, भाजप जिल्हाध्यक्ष आ.सचिन दादा कल्याणशेट्टी साहेब यांनी बहू प्रतीक्षेत उजनीचे पाणी दिलेल्या शब्दाप्रमाणे मतदारसंघात आणून वचनपूर्ती केल्याबद्दल व अक्कलकोट तालुक्यातील मतदारसंघात सर्वाधिक निधी मंजूर करून आणल्याबद्दल त्याच प्रमाणे आचेगावास सर्वाधिक निधी मंजूर केल्याबद्दल ग्रामदैवत श्री. शावरसिद्ध व श्री. शिलिसिध्द देवस्थान ट्रस्टचे विश्र्वस्त पदाधिकारी, व ग्रामपंचायत आचेगांव, समस्त ग्रामस्थ, यांच्याकडून, जगातील सर्वात लोकप्रिय भारत देशाचे पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी साहेब व देशाचे गृहमंत्री मा. श्री. अमित शहा साहेब यांच्या सोबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे छायाचित्र असलेले फोटो देऊन सत्कार व सन्मान करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य तथा देवस्थान विश्र्वस्त मलकारी कोरे तसेच आचेगांवचे श्री. शावरासिद्ध ग्राम विकास पॅनलचे प्रमुख दत्तात्रय पाटील साहेब,(झख), महादेव पाटील,(माजी सरपंच),इरफान पटेल,रफीक मुल्ला (उपसरपंच,)तसेच ट्रस्टीचे विश्र्वस्त पदाधिकारी शावरसिद्ध जळगोडर सर, काशण्णा मेलेवडीयार , बिळेणी करीवडीयार, बनसिध्द पुजारी, मलकारी शिलेणी, सिद्धाराम सुतार व गावकरी आदी मान्यवर उपस्थित होते.

विकसित भारत संकल्प यात्रा.....

## केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करावे : जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद

सोलापूर/प्रतिनिधी: जिल्ह्यात २३ नोव्हेंबर २०२३ पासून विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत विविध केंद्रीय योजनांची माहिती शहरी व ग्रामीण भागात देण्यासाठी चित्ररथ गावोगावी व शहरात फिरत आहेत. तरी सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती तसेच लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्यासाठी सूक्ष्म नियोजन करून त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी व प्रत्येक पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित विकसित भारत संकल्प यात्रा आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे, निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब कांबळे, उपजिल्हाधिकारी महसूल विठ्ठल उदमले, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी, कृषी उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा प्रशासन अधिकारी नगरपालिका वीणा पवार, महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप, जिल्हा पुरवठा अधिकारी संतोष सरडे, अन्नधान्य वितरण अधिकारी सुमित शिंदे यांच्यासह अन्य विभाग प्रमुख तर ऑनलाईनद्वारे सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, नगरपालिकांचे मुख्याधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद म्हणाले की, विकसित भारत संकल्प यात्रे अंतर्गत जिल्ह्याच्या शेवटच्या घटकापर्यंत केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची माहिती पोहोचवण्यासाठी सर्व संबंधित विभागाने केलेल्या सूक्ष्म नियोजनाची काटेकोरपणे अंमलबजावणी झाली पाहिजे याकडे लक्ष द्यावे. सर्व तालुकास्तरीय यंत्रणांनी चित्ररथ कोणत्या गावात येणार आहे.याबाबतची पूर्वप्रसिद्धी विविध माध्यमांचा वापर करून करावी व चित्ररथ गावात पोहोचल्यानंतर पात्र लाभार्थ्यांना विविध । पान २ वर

## संपादकीय

### मोदी यांचा दृष्टिकोन...

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा विकासाचा दृष्टिकोन सर्वांना विकासाकडे घेऊन जाणारा आहे, हे समोर आले आहे. आयुष्य एकदाच मिळते आणि म्हणून आयुष्यात मोठी उद्दिष्टे समोर ठेवा, असे एक प्रसिद्ध वचन आहे. त्या वचनाला तंतोतंत जुळणारे असे मोदी यांचे वर्तन आहे. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या कार्यकाळात भारताने किती मोठी झेप घेतली आहे, हे समजण्यासाठी तसाच दृष्टिकोन हवा आणि तशीच दूरदृष्टी हवी. गरिबांसाठी असलेल्या अनेक योजना समाजातील तळागाळापर्यंत पोहोचल्या आहेत. दरम्यान, सूरत येथील विशालकाय डायमंड बोर्सच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना मोदी यांनी माझ्या पंतप्रधानपदाच्या तिसऱ्या टर्ममध्ये भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनवणार असल्याचे त्यांनी सांगितले आणि ही मोदी की गॅरंटी असल्याचेही स्पष्ट केले. मोदी यांच्याकडे आपल्या साध्य करावयाच्या ध्येयाबद्दल ठाम विश्वास आहे. हाच विश्वास त्यांना नवनवीन यशाच्या शिखराकडे नेत आहे. मोदी यांचा हा विश्वास पाहून काँग्रेससह अनेक विरोधी पक्षांच्या पोटात गोळा येत असतो. पण विरोधासाठी विरोध म्हणून रचलेली त्यांची प्रत्येक चाल वायाच जाते. उलट जितके विरोधी पक्ष मोदी यांच्यावर टीका करतात आणि त्यांना वाटेल त्या शिव्या देतात, त्यातून दरवेळेस मोदी नव्या झळाळीने समोर येतात. सूरत येथील डायमंड बोर्सच्या उद्घाटनप्रसंगी मोदी यांनी काढलेल्या उद्गारांना हीच पार्श्वभूमी आहे. या डायमंड बोर्समधून आठ लाख रोजगार निर्माण होणार आहेत. भारत ही आधुनिक हिरे, दागदागिने या क्षेत्रात विकसित बाजारपेठ म्हणून समोर आणण्याचा हेतू या डायमंड बोर्स उभारण्यामागे आहे. आर्थिक बाजारपेठेत सध्या सोन्याला प्रचंड भाव आहे आणि लोकांसाठी तो एक गुंतवणुकीचा उत्तम पर्याय आहे. जमीन आणि शेती या क्षेत्रातील गुंतवणूक आता मागे पडत चालली आहे. त्याची जागा सोन्यातील गुंतवणुकीने घेतली आहे. या परिस्थितीत सोन्याच्या बाजारपेठेत डायमंड बोर्स उभारून मोदी यांच्या नव्या भारताने आपण काळाबरोबर पावले टाकत असल्याचे संकेत दिले आहेत. सूरत हे हिऱ्यांचे शहर म्हणून ओळखले जाते आणि तेथील हिरे व्यापार हा जगभर प्रसिध्द आहे.

सध्या लोकसभेसह विधानसभेच्या निवडणुकीचे वारे देश भर वाहु लागले आहे. काही राज्यात तर विधानसभा निवडणूक पार पडल्या. जेथे निवडणूक पार पडल्या तेथे अनेक प्रश्र्न उपस्थित झाले. इव्हिएम विरोधात लोक रस्त्यावर उतरत आहेत. तरीही निवडणूक आयोग लोकांचे म्हणणे ऐकून इव्हिएमवर बोलायला तयार नाही. सर्व जन इव्हिएम नको म्हणत असताना कमळावाले मात्र इव्हिएम योग्यच असल्याचा काल्पनिक दावा करतात. कारण इव्हिएम हे इलेक्ट्रॉनिक डिव्हाईस असल्याने ते कोणताही तंत्रज्ञ त्याला नियंत्रित करू शकतो. दुसरी सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे बँकेसारखे अतिशय गुप्त व सुरक्षित असलेले सॉफ्टवेअर हॅंक करून अनेक प्रकारचे फसवणुकीचे प्रकरण नेहमीच घडत आहेत, तिसरी गोष्ट म्हणजे ज्या देशांनी इव्हिएमचा शोध लावला तेच देश इव्हिएम वापरत नाहीत. आश्र्चर्याची गोष्ट म्हणजे इव्हिएम मध्ये गडबडी होऊ शकते म्हणून सर्वोच्च न्यायालयात सर्वात अगोदर कमळावाले जेष्ठ नेतेच गेले होते. २०१४ पुर्वी आजचे प्रधानमंत्री हे सतत बोलत होते सुशिक्षित देशात इव्हिएम वापरत नाहीत तर भारतात का वापरली जाते? आज कमळावाले सोडून बाकी सर्वच पक्ष, पक्षाचे सोडा पण सर्वसामान्य जनतेला निवडणूक पारदर्शक होत नाही असे वाटत आहे. तरीही याची दखल घेऊन इव्हिएम विरोधात पाहिजे ते ठोस पाऊल उचलले जात नाही. इव्हिएमच्या माध्यमातून मताधिकार पुर्णपणे बंद झाला आहे, अनेक ठिकाणी विरोधी पक्ष नष्ट करण्यात आला आहे. स्वायत्त संस्थेचा गैरवापर वापर करून विरोधी भ्रष्ट नेत्यांना स्वतः च्या पक्षात घेऊन स्वच्छ केले जात आहे. लोकांचे हक्क अधिकार यावर बंधने येत आहेत. संविधानाने निर्माण केलेले शिक्षण, नोकरी यावर बंदी घातली गेली. सामाजिक अन्याय वाढले आहेत. लोकशाहीचे रुपांतर हुकुमशाही मध्ये होत आहे. भ्रष्टाचार व महागाई ने जनता होरपळत आहे. लोकविकासाचे लाखो करोडोचे बजेट कुठे गायब होते यावर कोणीही बोलायला तयार नाही. या मध्ये सर्वात जास्त होरपळणारी जनता आहे. संविधानाने जनतेला राजा बनवले परंतु संविधान विरोधी शक्ति सत्तेत असताना संविधान संपविण्याचे कटकारस्थान येथे रोजच होत आहेत. लोकशाहीमध्ये जो राजा आहे तो समस्या ग्रस्त आहे आणि जो सेवक आहे तो मेवा खात आहे. एवढी गंभीर परिस्थिती असताना ही संविधान व लोकांचे हक्क अधिकार आणि विकासाचे मार्ग संपवणाऱ्या शक्ति येणाऱ्या निवडणूकीची तयारी जोरात करत आहेत. संविधान व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना डोक्यावर घेऊन गाजावाजा करणारे आंबेडकरवादी पक्ष व नेते यांची येणाऱ्या निवडणुकीत काय भुमिका असेल हे अजूनही कळत नाही. ढिगभर नेते ढिगभर पक्ष संघटना एकत्र येऊन संविधान वाचवण्यासाठी, हक्क अधिकारासाठी हातात हात देतील तर खऱ्या अर्थाने काही प्रमाणात का होईना पण प्रस्थापित पक्षांवर, नेत्यावर दबाव निर्माण होईल. परंतु वैचारिक दृष्टीने परिपक्क आणि संविधानाचा अभ्यास असलेले राजकीय नेते जर संविधान विरोधी किंवा निवडणुकी पुरते बाबासाहेब आंबेडकर संविधानाचे नाव घेणाऱ्या पक्षासोबत जाऊन त्यांची

## निवडणुकी मध्ये आंबेडकरवादी पक्षाची भुमिका काय?

ताकद वाढवल्यापेक्षा सर्व आंबेडकरवादी पक्ष संघटना एकत्र स्वतः ची ताकद का वाढवत नसतील? बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार फक्त भाषणात सांगायचे आहेत की वास्तवात आचरण करायचे आहेत? सुशिक्षित, संविधानाचा आदर असलेले नेते स्वतः च गटतट करण्यात धन्यता मानत असतील, स्वतः ची शक्ती, स्वतः ची गुणवत्ता एकत्र न येता बेकीने कमकुवत करत असतील, प्रस्थापित पक्षांच्या आमिषांच्या मागे लागत असतील तर संविधानाचा सन्मान करणार तरी कोण? सामाजिक प्रश्र्न, शिक्षण, नोकरी, आरोग्य सुविधा, देशाची एकता आणि अखंडता यावर बोलणार कोण? असे प्रश्र्न निर्माण होत आहेत. शाळा बंद करून शिक्षणाचा बाजार मांडला गेला. सरकारी शाळेत मुलांची संख्या कमी का झाली याचा अभ्यास न करणारे सरकार लोक बिअर कमी का पित आहेत त्याचा अभ्यास करण्यासाठी समिती नेमुन बिअर प्यायला प्राधान्य द्यायला लावते. शासकीय नोकरदारांची संख्या कमी करून शासकीय कामे खाजगी व त्यातही कंत्राटी पद्धतीने करून घेतली जात आहेत. यावरही कोणी बोलायला तयार नाही. देशामध्ये समस्येचे थैमान आहे. राजकीय पक्ष निवडणुकीची तयारी करून नावाला का होईना पक्ष बांधनी करत आहेत. पक्षाचा अंजेडा तयार करून तो कसा राबवायचा यावर त्यांचे काम सुरू आहे. एकीकरणा शिवाय पर्याय नाही हे आंबेडकरवादी नेत्यांना कळूनही एकत्र येत नसतील तर यांचे नेतृत्व एक तर समजाच्या समस्या सोडवून संविधानाचे रक्षण करण्यासाठी नाही किंवा दुसरे म्हणजे यांना स्वतः च्या दुकानदारीतुन स्वतः साठी काही कमवायचे आहे हेच सिद्ध होते. इव्हिएम आल्याने अतोनात नुकसान होत असताना, मताधिकार नष्ट होताना, संविधानाचे उल्लंघन होताना, हक्क अधिकार दाबल्या जाताना खरा आंबेडकरवादी हा खुर्ची, मानपान, आणि कंसात राष्ट्रीय अध्यक्ष पदासाठी हापापलेला कसा असु शकतो? स्वतःला आंबेडकरवादी म्हणवून घ्यायचे, स्वतःला संविधानाचे समर्थक व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराचे वारस समजयचे तर अगोदर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार स्वतः स्विकारने हे सर्वात मोठे नैतिक कर्तव्य आहे. आणि यामध्ये एकी हे सर्वात महत्त्वाचे आहे. आंबेडकरवादी नेते एकीकरण करत नाहीत म्हणून त्यांचे राजकीय वजन निर्माण झाले नाही. राजकीय वजन निर्माण झाले नाही म्हणून संविधान विरोधी व जनहिताच्या विरोधी कामे येथे होत आहेत. आंबेडकरवादी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रश्र्न, नोकरी, शिक्षण प्रश्र्न वस्तीगृह प्रश्र्न, सामाजिक न्यायाचा प्रश्र्न नेहमीच ज्वलंत राहत आहेत. एकही प्रश्र्न सुटत नाही याचे एकमेव कारण म्हणजे आंबेडकरवादी नेत्यांमध्ये एकी नाही. २०२४ मध्ये आंबेडकरवादी नेते एकत्र झाले तरी सकारात्मक परिणाम दिसून येतील. सर्वांनी एकत्र येऊन इव्हिएम विरोधात आवाज उठवला तरीही खुप मोठे काम होईल. कारण ईव्हिएम जरी आज बंद झाली तरीही जवळपास अर्ध्या समस्या सुटतील.

परंतु कळते पण कळत नाही अशी अवस्था आंबेडकरवादी नेत्यांची झाली आहे. स्वतः च्या दुकानात स्वतः च स्वतःला राष्ट्रीय अध्यक्ष म्हणवून घेऊन स्वतः चाच जयजयकार करण्यात धन्यता माणणारे नेते जनतेचे कधी होणार याचीच वाट आंबेडकरवादी जनता बघत आहे. निवडणुकीच्या तोंडावर आंबेडकरवादी नेते जर संविधान, सामाजिक प्रश्र्न यावर बोलत नसतील, आपले मत व राजकीय अजेंडा जाहीर करत नसतील, एकत्र येण्याची तयारी दाखवत नसतील तर आंबेडकरवादी जनताच देशात शिल्लक आहे, नेते नाहीत असे समजावे लागेल. कारण फक्त सोयीनुसार संविधान किंवा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणारा, आणि निळे कपडे, टोप्या वापरणारा आंबेडकरवादी मुळीच नसतो. जो संविधानाचा सतत प्रचार प्रसार करतो, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सतत प्रचार आणि प्रसार करतो. परंतु कोणत्याही पदाची, मानापानाची, खुर्चीची अपेक्षा न करता केवळ देशाचा नागरिक म्हणुन व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा अनुयायी म्हणून जगतो. तोच खरा आंबेडकरवादी होय. आंबेडकरवादी नेत्यांकडे एक सुवर्ण संधी आहे ज्या संधीचे सोने केले तर ते देशात चांगली क्रांती करू शकतात ती म्हणजे सर्वांनी एकत्र येऊन जनहिताचा व संविधानाच्या अंमलबजावणी चा अजेंडा तयार करून त्याची योग्य अशी मांडणी करणे होय. लोकांना आज संविधाना बद्दल जागृती करून सामाजिक समस्येला वाचा फोडणारा निर्भीड नेतृत्व पाहिजे आहे. सध्याचे राजकारण पाहता राजकीय नैतिकता व प्रमाणीकता नष्ट होऊन जनतेच्या जिवावर मलिदा खाणाऱ्यांची संख्या वाढली आहे. असे असताना निर्भीड, एकसंघ, व वैचारिक नेतृत्व व इव्हिएम बंदी हाच एक नवीन उपाय जनतेसमोर उभा आहे. इव्हिएमला विरोध जरी करण्यासाठी एखादे नेतृत्व समोर आले तर लाखों लोकांचे समर्थन मिळते. अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. आणि या परिस्थितीचा जर फायदा घेत नसेल. तर येणाऱ्या काळात आंबेडकरवादी जनता नक्कीच शिल्लक राहील मात्र नेत्यांचा प्रभाव व मानसन्मान नसल्यात जमा होईल. म्हणून आंबेडकरवादी समजणाऱ्या नेत्यांनी सर्वकाही सोडून केवळ राष्ट्रहीत व संविधान या मुद्द्यावर एकत्र येऊन संविधान विरोधी, हक्क अधिकार विरोधी व्यवस्थेशी वैचारिक ताकदीने लढा देण्यासाठी सज्ज होणे आवश्यक आहे. आणि हि तयारी आताच करून २०२४ च्या निवडणुकी अगोदर आपली भुमीका आणि अजेंडा जनमानसात पसरवणे खुपच आवश्यक आहे. तरच आपण आंबेडकरवादी नेते जागृत आहोत हे सिद्ध होईल. एकत्र येऊन सत्ता हस्तगत केल्या शिवाय पर्याय नाही. बेकीने राहुन स्वतः चे महत्त्व कमी तर होणार पण आंबेडकरवादी चळवळीचे गतीररोधक म्हणून ओळख कायम राहील. आंबेडकरवादी चळवळीसाठी संविधानासाठी आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराच्या प्रसार प्रसारासाठी एकत्र येऊन सामुहीक भुमिका मांडणे आजची गरज आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मोबा: ९१३०९७९३००**

पान १ वरुन

### केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा..

विभागांच्या योजनांचा लाभ मिळवून द्यावा असे निर्देश त्यांनी दिले. विकसित भारत संकल्प यात्रा जिल्ह्यात २३ नोव्हेंबर २०२३ ते २६ जानेवारी २०२४ पर्यंत राबविण्यात येत असून या माध्यमातून या कालावधीत एक ही पात्र लाभार्थी केंद्राच्या कोणत्याही योजनापासून वंचित राहणार नाही. यासाठी प्रत्येकाने जबाबदारी पूर्वक काम करावे. केंद्र शासनाकडून या यात्रेच्या अनुषंगाने वेळोवेळी आढावा घेतला जात असून, सोलापूर जिल्हा ही योजना राबवण्यात राज्य व देश पातळीवर प्रगतीपथावर राहील यासाठी संबंधित सर्व विभाग प्रमुख आणि त्यांच्या अधिनस्त अधिकारी कर्मचाऱ्यांकडून उत्कृष्ट काम करून घ्यावे असेही त्यांनी सूचित केले.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात आठ चित्ररथाच्या माध्यमातून केंद्रीय योजनांची प्रचार व प्रसिद्धी सुरू असून प्रत्येक चित्ररथ प्रति दिवस दोन गावात जाऊन योजनांचा प्रसार करत आहे. त्याचप्रमाणे पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. विहित कालावधीत चित्ररथाच्या माध्यमातून एक हजार एकोणीस ग्रामपंचायत मध्ये पात्र लाभार्थ्यांना शंभर टक्के केंद्रीय योजनांचा लाभ देण्यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केलेले असून त्यानुसार अंमलबजावणी केली जात असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी दिली.

यावेळी आयुष्यमान भारत, सुरक्षा विमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, प्रधानमंत्री विश्र्वकर्मा योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान योजना, पोषण आहार योजना, उज्वला गॅस योजना, प्रधानमंत्री स्व निधी योजना व अन्य योजनांचा आढावा जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी घेऊन मार्गदर्शन सूचना दिल्या.

### ‘जे एन-१’ला घाबरू नका,

दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

‘जेएन-१’ हा व्हेरियंट धोकादायक नसला तरी आरोग्य विभागातील अधिकाऱ्यांनी सर्व तयारीनिशी सतर्क राहण्याच्या सूचना डॉ. सावंत यांनी दिल्या. नागरिकांमध्ये अफवा पसरून भीतीचे वातावरण निर्माण होणार नाही याची काळजी जिल्हा स्तरापासून घेण्यात यावी. यासाठी नागरिकांमध्ये जागरुकता निर्माण करावी. ‘जेएन-१’वर नियंत्रण मिळविण्यासाठी जिल्हा आणि तालुका स्तरावरील सर्व आरोग्य संस्थांचे गांभीर्याने आणि वस्तुस्थितीला धरून मॉकड्रिल करावे. हलगर्जीपणा न करता आरोग्य यंत्रणा, विलागीकरण कक्ष, ऑक्सिजनची सुविधा, अतिदक्षता विभाग, व्हेंटीलेटर आणि महत्त्वाची उपकरणे कार्यरत असल्याबाबत प्रत्यक्ष जाऊन तपासणी करावी आणि त्याबाबतचे व्हिडिओ तयार करून राज्य स्तरावरील वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठवावेत. प्रत्येक जिल्ह्यात संशयित रुग्णांच्या चाचण्यांची संख्या वाढविण्याची गरज असून चाचणी, सर्वेक्षण आणि उपचार या त्रिसूत्रीचा अवलंब करावा, अशा सूचना डॉ. सावंत यांनी प्रशासनाला दिल्या आहेत.

नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्यासाठी समाजमाध्यमासह जिल्हा रुग्णालय, आपला दवाखाना येथे फलक लावण्यात यावेत. त्याचप्रमाणे नागरिकांमध्ये चुकीची माहिती पसरू नये यासाठी माध्यमांना माहिती देण्यासाठी एका नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करावी. या अधिकाऱ्यामार्फतच याविषयीची अधिकृत माहिती देण्यात यावी. जेणेकरून अफवा आणि चुकीची माहिती प्रसारित होणार नाही. प्रसारमाध्यमांनीही याविषयीचे वृत्त देताना वस्तुस्थितीची पडताळणी करावी नागरिकांमध्ये विनाकारण भीती पसरेल अशी चुकीची माहिती प्रसारित करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

### कर्नाटकमधील हिजाबवरील बंदी..

दिली होती. तेव्हापासूनच कर्नाटकमधील हिजाबवरील बंदी उठवली जाणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. अखेर सिद्धरामय्या यांनी शुक्रवारी (२२ डिसेंबर) ही बंदी उठवण्याचा निर्णय जाहीर केला. त्यावेळी बोम्मई म्हणाले होते की, देशातील समानता, सार्वजनिक कायदा आणि सुव्यवस्थेसमोर अडथळा निर्माण करणाऱ्या कोणत्याही पोशाखाला मंजुरी दिली जाणार नाही. बोम्मई सरकाच्या या निर्णयानंतर राज्यात अनेक मुस्लीम संघटनांसह काँग्रेसने निदर्शने केली होती. तसेच राज्यात तणाव निर्माण झाला होता. परंतु, बोम्मई सरकारने त्यांचा निर्णय मागे घेतला नाही. पुढे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयापर्यंत पोहोचलं. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने याप्रकरणी सन्यायाधीशांना विनंती केली होती की, हे प्रकरण वरिष्ठ खंडपीठाकडे सोपवावं. अद्याप हे हिजाबवरील बंदीचं प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.

### राज्यात हुडहुडी! थंडीचा..

सकाळपासूनच गुळाचा चहा, मिरची भजे आणि झणझणीत मिसळ खाण्यासाठी जळगावकरांनी गर्दी केल्याचं चित्र जळगावमध्ये अनेक ठिकाणी बघायला मिळत आहे.

पंढरपुरात दिवसभर ढगाळ वातावरण आणि रात्री कडाक्याची थंडी पडू लागल्याने नागरिक मोठ्या संख्येने आजारी पडू लागले आहेत. गेल्या दोन दिवसापूर्वी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीनंतर आता नाशिकच्या येवला शहरासह परिसरात थंडी आणि दाट धुक्याची चादर पसरली आहे. दाट धुक्यामुळे परिसरातील शेत तसेच रस्ते देखील दिसून येत नसल्याचे चित्र होते. 'मॉर्निंग वॉक' ला जाणाऱ्या येवलेकरांनी या गुलाबी थंडीसह दाट धूक्याच्या चादरीचा मनमुराद आनंद घेतला. दरम्यान, या धुक्याचा परिणाम शेतीपिकांवर होणार असून गारपिटीमूळे वाचलेल्या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव होणार आहे.

### काँग्रेस नेते सुनिल केदार..

अशा एकूण सहा जणांना दोषी मानले आहे. तर इतर तिघांना निर्दोष जाहीर केले आहे. दरम्यान, सध्या कोर्टात शिक्षेच्या प्रमाणावर युक्तिवाद सुरु आहे. सहा दोषींचे वकील युक्तिवाद करत आहेत. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १५० कोटी रुपयांच्या घोटाळा प्रकरणी अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात निकाल सुनावला जात आहे.

**‘हे’ सहा जण दोषी** १) सुनील केदार २) अशोक चौधरी ३) केतन शेठ ४) अमित वर्मा ५) सुबोध भंडारी ६) नंदकिशोर त्रिवेदीनागपूर जिल्हा बँक घोटाळ्यातील खटल्याचा निकाल आज लागणार आहे. यामध्ये काँग्रेस नेते आणि माजी मंत्री सुनील केदार यांना दोषी ठरवण्यात आलं आहे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००२ मध्ये १५० कोटींहून अधिक रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पुणे पुस्तक महोत्सवाला भेट

पुणे : पुस्तक महोत्सवाच्या माध्यमातून वाचनसंस्कृतीला चालना देऊन विचार, संस्कृती आणि विज्ञान शेवटच्या माणसापर्यंत पोहोचवता येईल; म्हणून राष्ट्रीय पुस्तक न्यासाने राज्यात विभागनिहाय पुस्तक महोत्सव आयोजित करावा, अशी सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

भारत सरकारचे शिक्षण मंत्रालय आणि राष्ट्रीय पुस्तक न्यासतर्फे आणि महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाला दिलेल्या भेटी प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला विधान परिषदेच्या उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार श्रीकांत भारतीय, सुनिल कांबळे, राहुल कुल, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे संचालक युवराज मलिक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.सुरेश गोसावी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पुणे महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे उपस्थित होते.

पुस्तके ज्ञान प्रवाह सर्वदूर पोहोचविण्याचे कार्य करतात, असे सांगून उपमुख्यमंत्री श्री.फडणवीस म्हणाले, ज्ञान संकुचित ठेवल्यास समाज प्रगती करू शकत नाही. पुस्तकामुळे विचार आणि व्यक्ती घडतात, व्यक्तीला जीवनाची दिशा सापडते, आपल्या विचारांच्या कक्षा रुंदवतात. पुस्तके आपल्यात सामाजिक जाणिवा निर्माण करतात.

समाजात कोणते साहित्य वाचले जाते यावरून समाजाचे प्रतिबिंब पाहायला मिळते. ऐतिहासिक पुस्तकांच्या माध्यमातून आपली स्वतःची ओळख, स्वातंत्र्याचे मोल समजते. त्यामुळे पुस्तके मोलाचा ठेवा आहे. राष्ट्राकडे संपत्तीपेक्षा पुस्तकरूपी विचारांचा खजिना किती मोठा आहे यावरून राष्ट्राचे वैभव ठरते, असे त्यांनी सांगितले.

पुस्तकांच्या रूपाने पुढच्या पिढीपर्यंत ज्ञान पोहोचविणारा पुस्तक महोत्सव समाजनिर्मिती आणि राष्ट्रनिर्मितीचे महत्वाचे साधन आहे, असे नमूद करून ते पुढे म्हणाले, पुणेकरांमध्ये ज्ञानसंपादन करण्याची लालसा जास्त असल्याने पुस्तक प्रदर्शनासाठी पुणे हे योग्य ठिकाण आहे, हे महोत्सवातून दिसून आले. विशेषतः तरुणांचा प्रतिसाद वाखाणण्यासारखा आहे. तरुणाई महोत्सवाकडे आकर्षित करणे ही सर्वांसाठी आनंदाची गोष्ट असल्याचे सांगून त्यांनी महोत्सवाच्या आयोजनाचे कौतुक केले.


हा देशाचा सर्वश्रेष्ठ पुस्तक महोत्सव असल्याचे नमूद करून श्री.मलिक म्हणाले, दिल्ली वगळता एवढा मोठा पुस्तक महोत्सव कुठेच होत नाही. महोत्सव यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्र शासन आणि प्रशासनाने चांगले सहकार्य लाभले. लोकसहभागातून भव्य आयोजन शक्य होते हे पुण्याने दाखवून दिले, असे त्यांनी सांगितले.

यावेळी श्री.पांडे यांनी प्रास्ताविकात पुस्तक महोत्सवाविषयी माहिती दिली. पुस्तक महोत्सवात चार विश्र्वविक्रम साकारले असून अशा स्वरूपाचा हा एकमात्र पुस्तक महोत्सव आहे. तरुणांनी पुस्तक खरेदीला दिलेला प्रतिसाद हे महोत्सवाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. अशी माहिती त्यांनी दिली. महोत्सवात पुणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमापूर्वी श्री.फडणवीस यांनी पुस्तक प्रदर्शनाला भेट दिली.

### तु लढ..!

तु लढ नको वाट पाहु
कोणाच्या संगतीची।
तुझ्यात आहे हिम्मत
जातीयतेला गाडण्याची।।१।
आग होऊ दे तुझ्यात
पेटलेल्या ठीणगीची।
तुझ्यात आहे हिम्मत
अन्यायी हात छाटण्याची।।२।।
तु लढ वाट पहातोय
समाज तुझ्या लढण्याची।
तुझ्यात आहे हिम्मत
वाघासारखी डरकाळण्याची।।३।।
आडवे येतील मार्गात
त्यांनाही आडवे करण्याची।
तुझ्यात आहे हिम्मत
अन्याया विरुद्ध पेटण्याची।।४।।
तु लढ वाट नको पाहु
शेळपटांची।
तुझ्यात आहे हिम्मत
समाजाला एक करण्याची।।५।।
वाघ असतील ते येतील
गरज नाही गुलामांची।
तुझ्यात आहे हिम्मत
गुलामीच्या बेड्या कापण्याची।।६।।
तु लढ नको वाट पाहु
कोणाच्या एकनिष्ठतेची।
तुझ्यात आहे हिम्मत
न्याय हक्क मिळवुन देण्याची।।७।।
कायद्याच्या कचाट्यात पकडुन
उखडवण्याची।
तुझ्यात आहे हिम्मत
गोरगरीबांसाठी सत्तांतराची।।८।।

**किर्तीसंध्या मो.८४२१७५२३१५**
**(मानसी पाठारे)**
**अंबरनाथ, महाराष्ट्र**




हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

दैनिक
यश सिद्धि न्यूज



# अनुकुल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही

छत्रपती संभाजी नगर : समाज जीवनात कार्यरत फुले शाहू आंबेडकराईट विचारधारेच्या हितचिंतकांना जागृत करण्यासाठी १७ डिसेंबर १९४६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताचे संविधान सभेत पहिले भाषण दिले होते, ज्यात संदेश दिला होता की, अनुकुल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही. या विधानाची प्रासंगिकता लक्षात घेऊन विधानाच्या ७७ व्या वर्धापन दिनानिमित्त या ज्वलंत विषयावर बामसेफ अंतर्गत फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने बामसेफ जनसंपर्क कार्यालय, द्वारा बी. बी. मेश्राम, प्लॉट क्रमांक ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजी नगर (औरंगाबाद), महाराष्ट्र येथे १७ डिसेंबर २०२३ ला एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. जेणेकरून फुले शाहू आंबेडकराईट चळवळीचे संघटनात्मक कार्यात वृद्धी होऊ शकेल.

या कार्यशाळेचे उदघाटन संभाजी ब्रिगेडचे प्रवक्ते ए. बी. पठाण यांनी केले. ते म्हणाले की, समाज परिवर्तनासाठी पे बॅक टू सोसायटीची संकल्पना अंमलात आणली पाहिजे. समता प्रस्थापित करायची असेल तर शेती आणि उद्योग धंद्याचे राष्ट्रीयीकरण केले पाहिजे. आपण विभाजित असल्याचे दुष्परिणाम आपल्या संघटन शक्तीवर होत आहेत. डी. एड. झालेला विद्यार्थी कलश यात्रेत ३०० रुपये रोजाने सहभागी होत असेल तर ही आपल्या समाजाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. स्वतःपासून सुरूवात करून आपल्यातील चुका शोधल्या पाहिजेत. काय अराजकता निर्माण करण्यासाठी भारताचे संविधानाची अंमलबजावणी केली जात नाही? हिंदू राष्ट्र म्हणजे नेमके काय? आपण सर्व परिवर्तनवादी महापुरुष वाचले पाहिजेत, ज्यातून याची उत्तरे शोधली पाहिजेत.



याप्रसंगी सचिन बनसोडे म्हणाले की, होऊ शकत है। च्या विचार प्रणालीतून उत्तर प्रदेशात चार चार वेळा सरकार स्थापन करण्यात आले आहे. आपण संख्येने कमी असलो तरी चालेल पण आपली कृती काय? हे महत्त्वाचे आहे कारण बुद्धांनी सुद्धा सुरूवातीला पंच वर्गीय भिक्खूना मार्गदर्शन केले होते. वर्तमान शासकांनी नवीन संसद बनविली आहे. आता ते नवीन संविधान बनविण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. आपण कुठे आहोत? विष्णू वाघमारे म्हणाले की, परिवर्तनवादी विचारांचे सरकार आले पाहिजे. मोहन गायकवाड म्हणाले की, समाज जीवनात आस्तिक आणि नास्तिक यामध्ये संघर्ष होत आलेला आहे. दैव वादामुळे माणसे विभाजित होतात. करिता आपण वैचारिक निरपेक्ष वादावर एकत्रित आले पाहिजे. एड. विलास रामटेके म्हणाले की, १९४५ ला दुसरे महायुद्ध झाले आणि या देशाला स्वातंत्र्य देण्याच्या उद्देशाने त्रिसदस्यीय कॅबिनेट मिशनची निर्मिती करण्यात आली. १६ मार्च १९४६ ला संविधान स्थापन करण्याच्या अनुषंगाने विचार पुढे आला. परंतु त्या संविधान सभेत जाण्यासाठी डॉ आंबेडकरांना दारेच नव्हे! तर खिडक्या सुद्धा बंद करण्यात आल्याच्या वल्गना करणारे नेते होते. तरीही जोगेंद्रनाथ मंडल यांच्या सहकार्याने ते तिथे पोहोचले.

प्रमुख वक्ते राजू बागूल म्हणाले की, भूतकाळात ज्यांनी हवा, पाणी, जमिनीवर राज्य केले ते जगावर राज्य करीत होते. आता मात्र तंत्रज्ञानात आघाडीवर असणारे मीडियाच्या माध्यमातून जगावर राज्य करू शकतात. मोबाईलचा सकारात्मक दृष्टीकोनातून वापर केला पाहिजे. ग्रामीण भागातील परिस्थिती फारच वाईट आहे, तिकडे आपण लक्ष दिले पाहिजे. स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करताना मानवी हक्क अधिकारांसाठी जनतेला जागृत केले पाहिजे, जेणेकरून भारताचे संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी होऊ शकेल.

या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप करताना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम म्हणाले की, ९ डिसेंबर १९४६ ला भारताचे संविधान सभेच्या कामकाजाला सुरूवात झाली. त्यात एकूण २९६ सदस्य होते. त्यापैकी २०७ सदस्यांनी कामकाजात भाग घेतला तर ८९ सदस्य अनुपस्थित होते अर्थात त्यांनी बहिष्कार टाकला होता. त्यातील बहुतांश सदस्य मुस्लिम लीग चे होते. १३ डिसेंबर १९४६ ला पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संविधानाचे साध्य व उद्दिष्ट सांगणारा ठराव मांडला होता, ज्याला पुरुषोत्तम दास टंडन यांनी अनुमोदन दिले होते तर डॉ. एम. आर. जयकर यांनी दुरुस्ती सुचविली होती. या दुरुस्तीला डॉ. आंबेडकरांनी पाठिंबा दिला होता. आणि स्पष्ट केले होते की, मुस्लिम लीग सह सर्वांना सामावून घेतल्याशिवाय या कृतीला अर्थ प्राप्त होणार नाही. करिता भारत पाकिस्तानची फाळणी समजून घेतली पाहिजे. आपण जबाबदारीने वागत असताना भारताचे संविधानाच्या चौकटीपासून भरकटता कामा नये. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी २२ डिसेंबर १९५२ ला संसदीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी कामकाजाच्या पूर्वावर्ती शर्थी सांगितलेल्या आहेत, ते नीट समजून घेतल्या पाहिजेत. मान्यवर कांशीराम यांनी होऊ शकत है। चा नारा दिला होता. ज्यातून शासनकर्ती जमात बनविण्यासाठी प्रयत्न केले, ज्यात ते काही प्रमाणात यशस्वी सुद्धा झालेत. करिता शासनकर्ती जमात व्हायचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती कल्पना मेंदू आणि मस्तकात असायला हवी, तरच आपण त्या दिशेने वाटचाल करू शकतो. खुसरू-ए-दक्खन राजासाब बी. श्यामसुंदर १९४८ ला मानवी हक्क अधिकारांसाठी युनोच्या परिषदेला गेले होते. तिथून परतताना येथील सरकारने त्यांना जायबंदी केले होते, यावरून मानवी हक्क अधिकारांची व्याप्ती आपण समजून घेतली पाहिजे. करिता बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, या देशात विभिन्न जाती व संप्रदाय असले तरी आपण एकसंघ झाल्याशिवाय राहणार नाही. एवढेच काय तर मुस्लिम लीग यांनासुद्धा एकसंघ भारतच त्यांच्यासाठी हिताचा आहे असे कालांतराने का होईना त्यांना मान्य करावेच लागेल. म्हणून ते शेवटी म्हणाले की, अनुकुल काळ व परिस्थिती निर्माण केल्यास जगातील कोणतीही शक्ती या देशाला एक होण्यापासून परावृत्त करू शकणार नाही. याची जाणीव ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. या कार्यशाळेला इंजिनिअर पौलास राजगिरे, पत्रकार साहिल पटेल, नीतिन बचके, सचिन बनसोडे, मुकेश घुमारे, विष्णू वाघमारे, मोहन गायकवाड, एड. राजू बागूल, एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते. या सर्वांनी विषयाच्या अनुषंगाने आपले मनोगत व्यक्त केले आहे. अशाप्रकारे आभार प्रदर्शनाने हर्षोल्हासात कार्यशाळेची सांगता झाली.

# वागदरी येथे ३८ लाख कामाचे भूमिपूजन हन्नुरचे उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते संपन्न



अक्कलकोट/प्रतिनिधीः वागदरी येथे विवध विकास कामाचे भूमिपूजन हन्नुरचे उपसरपंच श्री सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रम अध्यक्षस्थानी सरपंच श्रीकांत भैरामडगी हे होते

आ सचिन दादा कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून पर्यटन विकास खात्याकडून वागदरी येथील श्री परमेश्र्वर मंदिर सभामंडपसाठी २५ लाख रु व तसेच २५१५ योजनेअंतर्गत श्री घाळीदास मंदिर सभामंडपसाठी ७ लाख रु आणि वार्ड क्रमांक ४ मधील माने घर ते भरमदे-कणमुसे घरापर्यंत सिमेंट रस्ता आणि बंदिस्त गटारसाठी ६ लाख रु असे एकूण ३८ लाख रु कामास सुरुवात करण्यात आले. याप्रसंगी ज्येष्ठ नेते श्रीशैल काका ठोंबरे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मंदिर समितीचे सचिव मल्लप्पा मामा निरोळी , भाजपा जिल्हा सरचिटणीस बसवराज शेळके सावकर ,जेष्ठ नेते प्रदीप जगताप,सरपंच श्रीकांत भैरामडगी,

मा उपसरपंच लक्ष्मीबाई पोमाजी,सुनील सावंत,प्रकाश पोमाजी, घाळय्या मठपती सर, उपसरपंच कमलाकर सोनकांबळे, ग्रा. प. सदस्य राजकुमार हुग्गे,हनिफ मुल्ला,शिवा घोळसगाव,रमेश मंगाणे, श्रीमंत कुंठोजी,शिवशरण यमाजी,परमेश्र्वर खसगी,दयानंद कुंभार, धनंजय सलगरे, रोहित शिंदे, राज शिंदे, सौरभ उंबरे, राम मोरे,विवेक कुंभार,संतोष पोमाजी, श्याम बाबर,शांतू कोठे,भाजपा महिला आघाडी उपाध्यक्ष जयश्री बटगेरी,महादेव सोनकवडे, रमेश मंगाने, मकबूल कणमुसे, परमेश्र्वर शेळके, माळप्पा धनगर, परमेश्र्वर मंदिर पंच कमिटी,परमेश्र्वर आराधना पंच कमिटी,घाळीदास मंदिर पंच कमिटी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# उडगीत सिद्धाराम म्हेत्रे यांच्या बॅनरची विटंबना; काँग्रेस कार्यकर्त्यांचा रास्ता रोको

शिरवण/हणमंत घोदेः उजनीतील पाणी कुरनूर धरणात येण्याआधीच पाण्याचा श्रेयवाद अक्कलकोट मतदारसंघात चांगलाच रंगला आहे. विद्यमान आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे पाण्यावरून डिजिटल



बॅनरबाजीचा विषय चांगलाच चर्चेत आला आहे. दरम्यान, तालुक्यातील उडगी येथे आज (दि. २२) पहाटे म्हेत्रे यांच्या डिजिटल बॅनरवर अज्ञात व्यक्तीने शेणफेक केल्याचा प्रकार घडला. त्यानंतर काँग्रेस कार्यकर्त्यांनी आणि म्हेत्रे समर्थकांनी आक्रमक भूमिका घेतली. टायर जाळून निषेध करत रास्ता रोको केला.दरम्यान, या घटनेची माहिती पोलीस पाटील यांनी दक्षिण पोलीस स्टेशनला तात्काळ कळवली. आंदोलकांनी संबंधित अज्ञात व्यक्तीवर कडक कारवाई करण्याची मागणी केली.पोलिसांनी आंदोलकांना शांतता राखण्याचे आवाहन करीत कायदा -सुव्यवस्था राखण्याचे आवाहन केले. त्यानंतर आंदोलकांनी रास्ता रोको मागे घेतला. उजनी धरणातून तालुक्यातील कुरनूर धरणात पाणी सोडण्यासाठी प्रयत्न केल्याचे दोन्ही आजी-माजी आमदारांच्या समर्थकांचे म्हणणे आहे. गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून या संदर्भातील डिजिटल बॅनर अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात झळकत आहेत.आठ दिवसांपूर्वी अक्कलकोट शहरात म्हेत्रे यांचे डिजिटल बॅनरची तोडफोड झाली आहे. आज पहाटे उडगी येथे बसस्टँड समोरील म्हेत्रे यांच्या डिजिटल बॅनरवर शेणफेक केल्याचा प्रकार घडला. या घटनेमुळे काही काळ वातावरण तणावपूर्ण होते.

# आरक्षणाची कायदेशीर सत्यता शासनाने मराठा समाजा समोर आणावी : राजेंद्र दाते पाटील

नागपूरःगेली अनेक वर्षापासून मराठा पक्ष संघटना गेली ३०- ३५ वर्षा पासुन मराठा आरक्षणावर जोरकस बाजुमांडत आलेली असुन त्यांनी निर्माण केलेल्या जागृतीच्या वातावरणा वर स्वार होऊन ही आमचीच यशोगाथा हा आविर्भाव निर्माण केल्याने आरक्षण मिळणार नसुन आरक्षण मिळविण्यास पात्र असलेल्या मराठासमाजाला कायदेशीर व घटनात्मक पद्धतीचा अवलंब केला तरच न्याय मिळू शकतो म्हणुन आता आरक्षणाची सत्यता शासनाने मराठा समाजा समोर आणावी असे स्पष्ट प्रतिपादन जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

पुढे बोलतांना ते म्हणालेकी,फक्त बाजु दाखवुन नव्हे तर ती निर्णय घेऊ शकणाऱ्या यंत्रणे समोर योग्य पद्धतीने मांडून आणि कायदेशीर व घटनात्मक पर्याय केंद्र शासनाच्या निदर्शनास आणुन द्यावा लागले आणि त्याची पूर्तता म्हणजे घटना दुरुस्ती ठरेल.

**आरक्षण का मिळावे कसे मिळावे हे अनेकांनी पूर्वीच सांगितलंय** मराठा आरक्षणाचा मागणी ३०-३५ वर्षा पासुन ऐरणीवर असुन ते कसे मिळेल हेच सातत्याने सर्वच पक्ष संघटना सातत्याने नमुद करत आलेल्या असुन हा .अश्र्वमेध राजकारणा साठी अडवण्याचा केविलवाणा व अयशस्वी प्रयत्न दिल्लीत परतण्यासाठी होत असल्याची चर्चा सामान्यतः मराठा समाजात होत आहे.राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाला भेट देउन नव्हे तर सुनावणीत पुरावे सादर करूनच आरक्षणाचा मार्ग मोकळा होउ शकतो.देशातील आणि राज्या तील आरक्षणाची स्थिती पहाता महाराष्ट्रात सद्य परिस्थिती ५०% च्या पुढे आरक्षण गेलेले आहे म्हणुन इंद्रा सहानी या प्रकरणात घातलेली मर्यादेची कॅप सतत आडवी येत असल्या मुळे मराठा समाजास स्वतंत्र असे एस.ई.बी.सी.आरक्षण देण्याचा कायदा भाजपाने महाराष्ट्रात केलेला होता, म्हणूनच राज्य शासनाने पुनर्विचार व क्युरेटिव्ह पिटिशन च्या माध्यमातून सर्वोच्च न्यायालयाकडून न्याय मिळविण्यासाठी प्रयत्न केलेले असुन त्यावर एक विंडो ओपन झालेली असल्याचे दिसत आहे.याचा उपयोग भविष्यात होणार असून जर यदा कदाचित तो न झाल्यास मात्र राज्य मागासवर्ग आयोगाचे स्वतंत्र गठण करून स्पष्ट निर्देश टर्म्स ऑफ रेफरंन्सेस निश्र्चित केलेले आयोग स्थापना होणे या पुर्वीच्या घटनापीठाने निरीक्षण नोंदवले असल्यामुळे त्यावर राज्य शासनाला मराठा समाजाचा क्वाटिफेबल डाटा जमा करून मराठा समाज सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास असल्याचे स्पष्ट शिफारस नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या राज्य मागासवर्ग आयोगा प्राप्त करून घेण्या शिवाय पर्याय राहणार नसुन मराठवाड्यातील कुणबी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी उपलब्ध पुरावे आणि कुणबी प्रमाण पत्र निर्गमित करण्याच्या नियमात योग्य तो बदल व शिथिलता कशी आणता येईल हे न्यायमुर्ती शिंदे समितीच्या प्राप्त अहवाला वरुन निश्र्चित करून तसे शासना देश काढणे आवश्यक ठरणार आहे.राजकीय दोषारोप हा मार्ग नसुन सामूहिक प्रयत्न यश मिळवुन देणार आहेत.



**आयोगाचे काम करतांना वेगळी बाजु व बाहेर आल्यावर राजकीय बाजु मांडून पोळी शेकण्याचा अयशस्वी प्रयत्न** मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी न्यायमुर्ती शिंदे समितीकडून कुणबी नोंदी शोधल्या जात असून,या समिती चा दुसरा अहवाल सरकारकडे सादर करण्यात आला आहे परंतु त्यातील शिफारशी कायदेशीर अंगाने न तपासताच पुढे कसे जाता येईल ? म्हणुन तो अहवाल नागरीकांची सनद म्हणुन जाहीर करणे आवश्यक हे.मराठवाड्यात कुणबी र्दींचा आकडा अत्यल्प ाहे. त्यामुळे केवळ ५ टक्के राठा समाजाला आरक्षण मेळणार असल्याची शक्यता काही आयोगवीर व्यक्त करीत असुन मराठवाड्या तील सुमारे ९५ टक्के मराठा समाज पुन्हा आरक्षणा बाहेर राहण्याची शक्यता आहे असे हे आयोगवीर तर म्हणत आहेतच परंतु कायदेशीर व घटनात्मक पर्याय मात्र सांगत नसल्याचे सतत स्पष्ट होत आहे. ज्या संकल्पनेचा उल्लेख इंद्रा सहानी न्यायनिवाड्यात आहे तो बेमालूम पने दिशाभूल करण्यासाठी काही आयोगवीर करत असल्याची चर्चा मात्र सुरू झाली आहे.हेच आयोगवीर मराठवाड्यात बहुतांश कुटुंबां कडे १९६७ पूर्वीच्या कागदपत्रात 'मराठा' अशी नोंदही उपलब्ध नाही आणि ज्या नोंदी तपासल्या त्यात ' कुणबी ' नोंद सापडत नाही असा शेरा मारत आहेत, ही मात्र दिशाभूल असुन न्यायमुर्ती शिंदे समितीकडून कुणबी नोंदी शोधल्या जात असून,

या समितीचा दुसरा अहवाल सरकारकडे सादर करण्यात आला आहे परंतु त्यातील शिफारशी कायदेशीर अंगाने न तपासताच पुढे कसे जाता येईल ? म्हणुन तो अहवाल नागरीकांची सनद म्हणुन जाहीर करणे आवश्यक आहे.

# दर्गहळ्ळी ग्रामस्थांकडून पाणीदार आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचा सत्कार

अक्कलकोट/प्रतिनिधीः दर्गहळ्ळी ता दक्षिण सोलापूर येथील ग्रामस्थांकडून पाणीदार आमदार माननीय श्री.सचिन दादा कल्याणशेट्टी यांचा दर्गहळ्ळी गावात उजनीचे पाणी आणून दिल्याबद्दल व दिलेल्या शब्दांचे तंतोतंत पालन केल्याबद्दल ग्रामस्थांकडून सत्कार करण्यात आला.यावेळेस भाजपा सरचिटणीस श्री.सुनिल कळके सावकार, भाजपा उपाध्यक्ष श्री. महादेव पाटील, ग्रा.प.सदस्य श्री.पंकज पाटील, व तसेच दर्गहळ्ळी गावचे मा.सरपंच खब्बाण्णा कोळी , ग्रा.प.सदस्य



श्री.विलास बिराजदार, ग्रा.प.सदस्य श्री. सोमनाथ सरसंबे, मा.सरपंच श्री. चन्नविर होनमुर्गीकर, पोलीस पाटील श्री. परमेश्र्वर पाटील,श्री.आप्पासाहेब पाटील, श्री. केदार उडाणे श्री.वर्दाशंकर कोळी,श्री.नागनाथ केंगावकर , श्री.महेश डबाणे,श्री.संतोष जाधव, श्री.व अदी ग्रामस्थ उपस्थित होते....


# पोस्टमन यशवंत यादव यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

सुपतगाव : आपल्या आयुष्याच्या कार्यकाळात अनेक ठिकाणी प्रत्येकांच्या घरापर्यत पायपीट करीत जाऊन प्रामाणकि पणे सेवा केली या सेवेनंतर डाक विभागाच्या वतीने त्याना या सेवेतून कार्य मुक्त केले आणी सेवा निवृत्तीचा निरोप दिला . वागदरी येथील शांत संयमी व एक व्यक्ती



महत्त्व असलेले यशवंत पांडुरंग यादव हे केंद्र सरकारच्या डाक विभागातून पोष्टमन म्हणून सेवा सेवा निवृत्ती झाल्या बद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यशवंत यादव यांनी नळदुर्ग येथील पोस्ट ऑफिस अंतर्गत तब्बल ४४ वर्षे वागदरीचे पोस्टमन म्हणून अत्यंत प्रामाणिक पणे निष्कंलक सेवा केली. त्यांच्यामुळे वागदरी गावात स्वतंत्र पोस्ट ऑफिस निर्माण झाले. पोस्ट ऑफिस मार्फत केंद्र सरकारच्या अनेक योजनेचा लाभ येथील ग्रामस्थाना यांनी मिळवून दिला. पोस्टात शेकडो ग्राहकांच्या आर्डी एफडी सारखे बचत खाते काढून लोकांना बचतीची सवय लावली. वेळेत सेवा देवून पोस्ट खात्याची विश्र्वासार्हता गावात निर्माण केली. तब्बल ४४ वर्षे पोस्ट खात्यात सेवाकरुन ते नुकतेच दी.१९ डिसेंबर २०२३ रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने नळदुर्ग पोस्ट कार्यालयात त्यांचा यथोचित सत्कार करून पुढील जीवनकार्यास त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. या प्रसंगी नळदुर्ग पोस्ट ऑफिस मध्ये तुळजापूर उपविभागीय अधिकारी जाधव यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी पोस्ट ऑफिस मधील गुरव ,वाघमोडे,सरवदे यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

# वसतिगृह साठी जागा देणाऱ्यांना अर्ज करण्यासाठी आवाहन




मुंबई/विजय घनघावः इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी मुंबई उपनगर जिल्ह्यामध्ये मुलांचे एक व मुलींचे एक शासकीय वसतिगृह सुरु करावयाचे आहे. विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभागाच्या ३० जानेवारी २०१९ च्या शासन निर्णयान्वये मुंबई उपनगर जिल्ह्यात दोन शासकीय वसतिगृह सुरु करण्यात येणार आहेत. इच्छूक म्हाडा, सिडको, बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच खासगी इमारत मालक, बांधकाम विकासक यांनी नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई उपनगर, आर सी चेंबुरकर मार्ग, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, चेंबुर (पूर्व), मुंबई ७१, (दूरध्वनी क्रमांक ०२२ २५२२२०२३) या कार्यालयामध्ये लेखी स्वरूपात अर्ज करावे, असे आवाहन मुंबई उपनगरचे सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी केले आहे.

### कोरोना जेएन-वन व्हेरिएंट, प्रशासन सज्ज

## भाविकांनी व नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी : प्रांताधिकारी गजानन गुरव



पंढरपूर/प्रतिनिधीः राज्यात सध्या जेएन-वन हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. पंढरपूरात श्री. विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून भाविक येतात.या पार्श्र्वभूमीवर तालुक्यातील आरोग्य यंत्रणा सज्ज असून, पंढरपूर शहरात दि.२५ ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत श्री शिव महापुराण कथा व श्री राम कथा सोहळा कार्यक्रमानिमित्त तसेच नाताळ सणानिमित्त सुट्टी असल्याने श्री. विठ्ठल दर्शनासाठी मोठ्या प्रमाणात भाविक येण्याची शक्यता आहे.या पार्श्र्वभूमीवर प्रशासन सज्ज असून, भाविकांनी व नागरिकांनी आवश्यकती दक्षता घेवून आरोग्य विभागाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी केले आहे.

पंढरपूर शहरात आयोजीत कार्यक्रमाच्या ठिकाणची तसेच शहरातील विविध ठिकाणी प्रांताधिकारी गजानन गुरव यांनी पाहणी केली. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अर्जून भोसले, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक महेश सुडके, उपमुख्याधिकारी सुनिल वाळूजकर, महावितरणचे श्री. भोळे, पोलीस निरिक्षक अरुण फुगे, आरोग्य निरिक्षक शदर वाघमारे उपस्थित होते.

श्री शिव महापुराण कथा व श्री राम कथा सोहळा निमित्त येणाऱ्या भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेवून जेएन-वन या कोरोनाचा नवा व्हेरिएंटच्या पार्श्र्वभूमीवर आयोजकांनी आवश्यक ती दक्षता घ्यावी. येणाऱ्या भाविकांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध होतील या दृष्टीने नियोजन करावे. मास्क, सॅनिटायझरची उपलब्धता ठेवावी. स्वच्छ पिण्याची पाण्याची व्यवस्था करावी. पाण्याचे वेळोवळी तपासणी करण्यात यावी. स्वच्छता गृहाची मुबलक प्रमाणात उपलब्धता ठेवावी,अन्न व औषध प्रशासनाकडून खाद्य पदार्थाची वेळोवेळी तपासणी करण्यात यावी. अग्निशमन यंत्रणा सज्ज ठेवावी त्याचबरोबर फायर ऑडीट, इलेक्ट्रीक ऑडीट करुन घ्यावे, सुरक्षित विद्युत पुरवठा होईल याची दक्षता घ्यावी, अशा सूचना प्रांताधिकारी गुरव यांनी केल्या.

आरोग्य विभागाने औषधसाठा, ऑक्सिजन पुरवठा, तपासणी लॅब, रुग्णवाहिका कार्यान्वित ठेवावी ज्यांचे लसीकरण झालेले नाही त्यांची माहिती घ्यावी. नागरिकांनी सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तात्काळ तपासणी करुन घ्यावी.गर्दीच्या ठिकाणी जाताना मास्क वापरावा आरोग्य प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे असे आवाहनही प्रांताधिकारी गुरव यांनी केले आहे.

कार्यक्रम सोहळयाच्या ठिकाणी आयोजकांनी भाविकांना सुरक्षेला प्राधान्य देवून आवश्यक नियोजन करावे. कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रखर प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे, पार्किंग व्यवस्था तसेच भाविकांना कार्यक्रमाच्या ठिकाणाहून ने-आण करण्यासाठी बसेसची व्यवस्थेबरोबरच स्वयंसेवकांची नेमणूक करावी. जेणेकरुन वाहतुकीस अडथळा निर्माण होणार याची दक्षता घ्यावी अशा सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अर्जुन भोसले यांनी दिल्या.पंढरपूरात श्री. विठ्ठल-रुक्मिणी दर्शनासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून भाविक येतात. राज्यात सध्या जेएन-वन हा कोरोनाचा नवा व्हेरिएंट आढळून आला आहे. मंदीर समितीकडूनही भाविकांच्या आरोग्य सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक ते नियोजन करण्यात येत असल्याचे मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगितले.यावेळी आयोजकांकडून भाविकांची सुरक्षा, आरोग्य सुविधा, स्वच्छता, शौचालयाची उपलब्धता, पार्किंग, शुध्द पिण्याचे पाणी, वाहतुक व्यवस्था आदी बाबतचे नियोजन करण्यात येत असल्याचे सांगितले.

## स्वेरीच्या अविराज नागटिळक यांना बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक; सलग दुसऱ्या वर्षी मिळविला पुरस्कार

पंढरपूर/प्रतिनिधीः शैक्षणिक क्षेत्रात विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना गुणवत्तेत परिपक्क बनवण्याचा ध्यास घेतलेली गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील 'स्वेरी' ही शिक्षण संस्था केवळ शैक्षणिक क्षेत्रातच अग्रेसर झाली आहे असे नव्हे तर आता क्रीडा क्षेत्रातही आपली चमकदार कामगिरी करत आहे हे मागील काही वर्षांपासून दिसून येत आहे. नुकत्याच कुर्डूवाडी येथे झालेल्या बॉक्सिंग स्पर्धेमध्ये स्वेरीच्या अविराज विजयकुमार नागटिळक यांनी सुवर्णपदक पटकावले. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



पुण्यश्र्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत कुर्डूवाडी येथील के. एन. भिसे कला, वाणिज्य व विनायकराव पाटील विज्ञान महाविद्यालयात आयोजलेल्या विद्यापीठ स्तरीय बॉक्सिंग स्पर्धेमध्ये स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागातील शेवटच्या वर्षात शिक्षण घेणारे विद्यार्थी अविराज नागटिळक यांनी ६४ किलो ते ६९ किलो वजन गटात प्रथम क्रमांकाने विजयी होऊन सुवर्णपदक मिळवले. त्यांनी बॉक्सिंगच्या अंतिम सामन्यात सांगोला महाविद्यालय सांगोल्याच्या अमित लोकरे यांचा पराभव केला. या विजयामुळे जानेवारी २०२४ मध्ये अमृतसर (पंजाब) मध्ये होणाऱ्या नॅशनल स्पर्धेसाठी अविराज नागटिळक यांची निवड झाली आहे. खेळाची आवड असलेल्या नागटिळक यांना सुरवातीपासून स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांची सातत्त्याने प्रेरणा मिळत होती. त्यामुळे अविराज यांनी शिक्षणाबरोबरच खेळाकडेही लक्ष दिले आणि आपले लक्ष्य गाठले. त्यांना क्रीडा मार्गदर्शक प्रा.संजय मोरे यांचेही मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम रहावे यासाठी स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच नियमित योगा करून घेतला जातो. स्वेरी मध्ये अत्याधुनिक सुविधा असलेल्या स्वतंत्र जीमची सोय देखील करण्यात आली आहे याचा विद्यार्थ्यांना नियमित फायदा होतो. अविराज नागटिळक यांनी बॉक्सिंग स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकवल्यामुळे त्यांचा स्वेरीच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी अविराज यांचे वडील ॲड.विजयकुमार नागटिळक, बंधू अजिंक्य नागटिळक देखील उपस्थित होते. बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदक मिळविल्यामुळे स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे, उपाध्यक्ष हनीफ शेख तसेच संस्थेचे विश्र्वस्त व पदाधिकारी, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार, स्वेरी अंतर्गत असलेल्या इतर महाविद्यालयांचे प्राचार्य, अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी अभिनंदन केले.

## पतसंस्थेच्या माध्यमातून शिक्षकांना अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न : यादव

पंढरपूर/प्रतिनिधीः सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था ही शिक्षक सभासदांसाठी आर्थिक आधार ठरत असून भविष्यकाळात या पतसंस्थेच्या माध्यमातून सर्व सहकाऱ्यांना विश्र्वासात घेऊन शिक्षक सभासदांना अधिकाधिक सेवा देण्याचा प्रयत्न करणार आहोत.

अशी ग्वाही सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे नूतन चेअरमन रामचंद्र यादव यांनी दिली.

रोपळे गावचे सुपुत्र व शिक्षक नेते रामचंद्र यादव यांची सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा पत्रकार व शिक्षक मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून सन्मान करण्यात आला. यावेळी यादव बोलत होते. पुढे बोलताना यादव यांनी पतसंस्थेच्या कामकाजाबाबत माहिती



दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष संपतराव देशमुख, सोलापूर जिल्हा प्राथमिक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष नारायण घेरडे, पंढरपूर तालुका प्राथमिक शिक्षक संघाचे कोषाध्यक्ष राहुल आर्वे, संचालक विजय बंगाळे, तालुका संघाचे संघटक अंकुश ढेंबरे, पत्रकार दादासाहेब कदम, संतोष रणदिवे, चैतन्य उत्पात, विनोद पोतदार, अमोल गुरव, युवा नेते राजेंद्र फुगारे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

## मतदार नोंदणी मोहिमेत सहभागी व्हावे : तहसिलदार सुशिल बेल्हेकर

### मतदार नोंदणीसाठी राजकीय पक्षांनी प्रशासनास सहकार्य करावे.

पंढरपूर/प्रतिनिधीः तालुक्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची घरोघरी जाऊन मतदार नोंदणीची मोहीम सुरू आहे. ही मोहीम पुढील चार दिवस सुरु राहणार आहे.मतदारांनी मतदान नोंदणी अधिकारी यांना मतदार यादीतील आपल्या नावांची तपासणी करणे, दुबार नावे वगळणे व मतदार यादीची शुद्धी करण्यासाठी सहकार्य करावे.तसेच नव मतदारांची नोंदणी करण्यासह मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी राजकीय पक्षांनी सहकार्य करावे, असे आवाहन सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसिलदार सुशिल बेल्हेकर यांनी केले आहे.

सास्कृंतीक भवन, प्रांत कार्यालय पंढरपूर येथे राजकीय पक्ष प्रतिनिधी तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांची बैठक घेण्यात आली. यावेळी निवडणूक नायब तहसिलदार वैभव बुचके, उपमुख्याधिकारी सुनिल वाळुंजकर, तहसिल कार्यालयाचे आर आर शिंदे तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी उपस्थित होते.



गाव पातळीवर सर्व संबंधित गावातील तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, आशा वर्कर, अंगणवाडी सेविका व कोतवाल यांची संयुक्त समिती तयार करण्यात आली असून सदर समितीकडून त्या गावातील सर्व मतदार यादी तपासून घेण्यात येणार आहे. यामध्ये मयत स्थलांतरित, आढळ न झालेले मतदार नव मतदार नोंदणी माहिती घेण्यात येणार आहेत. तसेच सदर तपासणी वेळी गावातील १८ ते २९ वयोगटातील सर्व नागरिकांच्या नावाचा समावेश आहे का नाही याचा शोध घेऊन ज्यांचे नाव मतदार यादीत नाही अशा नागरिकांची नावे बीएलओमार्फत अर्ज क्रमांक ६ भरून घेण्यात यावा अशा सूचना सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार सुशील बेल्हेकर यांनी दिल्या.

मतदार यादी मध्ये नाव समाविष्ट करणे मयत व दुबार मतदारांची नावे वगळणे, स्थानांतर करणे, नावात दुरुस्ती करण्याची संधी पूननिरीक्षण कार्यक्रमामुळे प्राप्त झाली आहे. प्रशासनामार्फत याविषयी व्यापक जनजागृती केली जात आहे. राजकीय पक्षांनी सुद्धा मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींची नेमणूक करून तसेच आपल्या स्तरावरून पूननिरीक्षण कार्यक्रमाची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचवून सहकार्य करावे. असे आवाहनही सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बेल्हेकर यांनी केले आहे.

## म्हेत्रे प्रशालेत गणित दिवस उत्साहात साजरा

दुधनी/निंगप्पा निंबाळः गणित तज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त आंतरराष्ट्रीय गणित दिवस तसेच आंतरराष्ट्रीय तृणधान्य दिन मातोश्री लक्ष्मीबाई सातलिंगप्पा म्हेत्रे प्रशाला व श्री. गुरुशांतलिंगेश्र्वर कनिष्ठ महाविद्यालय दुधनी येथे श्री. म. नि .प्र. डॉ. शांतलिंग महास्वामीजींच्या दिव्य सानिध्यात संपन्न झाले. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रशालेत गणितीय पोस्टर, हस्तकला, रांगोळी स्पर्धा, गणितीय उखाणे, सामान्यज्ञान स्पर्धा परीक्षा तसेच विविध तृणधान्य प्रदर्शन, तृणधान्यापासून विविध कलाकृती असे विविध उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमामध्ये १००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविले. या उपक्रमातून प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना देखील शैक्षणिक साहित्य देण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे सचिव मा. श्री. प्रथमेशजी म्हेत्रे तसेच प्रमुख पाहुणे म्हणून



श्री. शिवचलप्पा सावळसुर, श्री. हनुमंत अंधेली हे उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता गणित विभागाचे शरणगौडा पाटील, बाशा लावणे ,स्थावरमठ सर आदीनी परीश्रम घेतले याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. हिरतोट सर, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांरी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी करडे यानी तर आभार कलबुर्गे यानी मानले

## महाराष्ट्राचे चिराग शेटटी, ओजस देवतळे, अदिती स्वामी, गणेश देवरूखकर यांना राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार

### राष्ट्रपतींच्या हस्ते नऊ जानेवारी २०२४ रोजी पुरस्काराचे वितरण

नवी दिल्ली : साठीचे राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार बुधवारी रात्री जाहीर झाले असून यात महाराष्ट्र राज्यातून चिराग शेटटी, ओजस देवतळे, अदिती स्वामी, गणेश देवरूखकर यांना राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार जाहीर झाला आहे. या पुरस्कारांचे वितरण राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते नऊ जानेवारी २०२४ रोजी एका विशेष कार्यक्रमात करण्यात येईल.




दरवर्षी खेळाडूंच्या चमकदार कामगिरीसाठी केंद्रीय युवा कल्याण आणि क्रीडा मंत्रालयाच्यावतीने राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार जाहीर करण्यात येतात. यावर्षी दोन खेळाडूंना 'मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार' तर २६ खेळाडूंना 'अर्जुन पुरस्कार' जाहीर झाला आहे.यासह एकूण नऊ खेळाडूंना आणि क्रीडा प्रशिक्षकांना 'द्रोणाचार्य' श्रेणीतील 'जीवनगौरव पुरस्कार', 'नियमित द्रोणाचार्य पुरस्कार' व 'जीवनगौरव पुरस्कार' जाहीर झाले आहेत. यासोबतच 'ध्यानचंद जीवनगौरव पुरस्कार' देशातील तीन खेळाडूंना जाहीर झालेले आहेत. 'मौलाना अबुल कलाम आझाद चषक' गुरू नानक विद्यापीठ, अमृतसर, लवली प्रोफेशनल विद्यापीठ, पंजाब आणि कुरूक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र या तीन संस्थांना घोषित करण्यात आला आहे.

मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार २०२३ महाराष्ट्रचे बॅडमिंटन पट्टू चिराग चंद्रशेखर शेट्टी यांना प्रदान करण्यात येणार आहे. उत्कृष्ट प्रशिक्षक द्रोणाचार्य पुरस्कार २०२३ मध्ये महाराष्ट्राचे मलखांब प्रशिक्षक गणेश देवरूखकर यांचा समावेश आहे. तर, तिरंदाजी या क्रीडा प्रकारासाठी ओजस देवतळे आणि आदिती स्वामी यांना आतापर्यंच्या चमकदार कामगिरीसाठी अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे.

'मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार'हा भारतातील सर्वोच्च क्रीडा सन्मान आहे, तर 'अर्जुन पुरस्कार'हा दुसरा सर्वोच्च सन्मान आहे. अर्जुन पुरस्कार विजेत्यांना १५ लाख रुपयांच्या रोख पारितोषिकासह प्रमाणपत्र देखील दिले जाते.

ऑगस्ट २०२३ मध्ये जर्मनीतील बर्लिन चॅम्पियनशिपच्या कंपाउंड तिरंदाज स्पर्धेत २१ वर्षीय ओजसने सुवर्ण जिंकणारा पहिला भारतीय बनून इतिहास रचला आणि संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. ओजसने चीनमधील हँगझोऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत तीन सुवर्णपदके जिंकून आणखी एक विक्रम केला. नागपूरचा गोल्डन बॉय तिरंदाज ओजस देवतळे याच्या तिरंदाजीतील असामान्य कामगिरीबद्दल प्रतिष्ठेच्या अर्जुन पुरस्कारासाठी त्याचे नाव जाहीर झाले आहे.

सातारा तालुक्यातील शेरेवाडी येथील आदिती गोपीचंद स्वामी ही क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च 'अर्जुन पुरस्कार' मिळविणारी जिल्ह्यातील पहिली खेळाडू ठरली आहे. आदिती ही कमी वयात जागतिक पातळीवर सर्वोच्च कामगिरी करणारी खेळाडू आहे. २०२३ मध्ये जागतिक तिरंदाजी स्पर्धेत कम्पाऊंड तिरंदाजीमध्ये तिने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले. आदितीने भारताला १४ वर्षांनंतर वर्ल्ड कपमध्ये ७२० पैकी ७११ गुण मिळवून वर्ल्ड रेकॉर्ड करून भारताचे नाव सुवर्ण अक्षरांनी लिहिले आहे. भारताला एशियन गेम्स, एशियन चॅम्पियनशिप, वर्ल्ड कप अशा अनेक स्पर्धांमधून तिने सुवर्णपदके मिळवून दिली आहेत.

सलग चारवर्ष कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना 'मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात येते. खेळात तसेच स्पर्धेतील उत्कृष्ट प्रदर्शनासाठी 'अर्जुन पुरस्कार' दिला जातो. खेळाडूंच्या मागील चार वर्षांतील उत्तम प्रदर्शन, नेतृत्व, खेळ आणि त्यातील शिस्तीसाठी या पुरस्काराची शिफारस केली जाते.

राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळातील प्रशिक्षण देण्यासाठी आणि खेळाडुंकडून स्पर्धांसाठी उत्कृष्ट कार्य करून घेणा-या क्रीडा प्रशिक्षकांची 'द्रोणाचार्य पुरस्कारा'साठी शिफारस केली जाते.

खेळ आणि स्पर्धेमधील आजीवन कामगिरीसाठी 'ध्यानचंद पुरस्कार' दिला जातो. यामध्ये खेळाडूंच्या चांगले प्रदर्शन आणि सेवानिवृत्तीनंतरही संबंधित क्रीडा प्रकाराला प्रोत्साहन देत राहण्यासाठी या पुरस्काराची शिफारस केली जाते.खाजगी अथवा सार्वजनिक क्षेत्रातील कॉरपोरेट संस्था ज्या खेळाडू आणि खेळांना प्रोत्साहन देतात अशा संस्थांना 'राष्ट्रीय खेल प्रोत्साहन' पुरस्काराने गौरविण्यात येते. आंतर विद्यापीठ स्पर्धांमध्ये उत्कृष्ट प्रदर्शनासाठी विद्यापीठाला मौलाना अबुल कलाम आजाद ट्रॉफी दिली जाते.

### राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार विजेत्यांची यादी

मेजर ध्यानचंद खेलरत्न :चिराग शेट्टी आणि सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी (बॅडमिंटन) अर्जुन पुरस्कार:ओजस देवताळे, आदिती स्वामी (दोघे तिरंदाजी), मुरली श्रीशंकर, पारुल चौधरी (दोघे ॲथलेटिक्स), मोहम्मद हुसामुद्दीन (बॉक्सिंग), आर. वैशाली (बुद्धिबळ), मोहम्मद शमी (क्रिकेट), अनुष अग्रवाल, दिव्यक्रिती सिंग (घोडेस्वारी), दिक्षा डागर (गोल्फ), कृष्ण बहादूर पाठक, सुशीला चानू (दोघे हॉकी), पवन कुमार, रितू नेगी (दोघे कबड्डी), नसरीन (खो-खो), पिंकी (लॉन बोल्स), ऐश्र्वर्य प्रताप सिंह तोमर, ईशा सिंह (दोघे नेमबाजी), हरिंदर पाल सिंग संधू (स्कॉश), अहिका मुखर्जी (टेबल टेनिस), सुनील कुमार, अंतिम (दोघे कुस्ती), नौरेम रोशिबिना देवी (वुशू), शीतल देवी (पॅरा-तिरंदाजी), इलुरी रेड्डी (अंध क्रिकेट), प्राची यादव (पॅरा-कॅनोइंग). '

उत्कृष्ट प्रशिक्षकांसाठी द्रोणाचार्य पुरस्कार (नियमित श्रेणी) : ललित कुमार (कुस्ती), आरबी रमेश (बुद्धिबळ), महावीर प्रसाद सैनी (पॅरा-ॲथलेटिक्स), शिवेंद्र सिंह (हॉकी), गणेश देवरुखकर (मल्लखांब). '

द्रोणाचार्य पुरस्कार (जीवनगौरव): जसकीरत सिंग ग्रेवाल (गोल्फ), भास्करन ई (कबड्डी), जयंता कुमार पुशीलाल (टेबल टेनिस). 'ध्यानचंद जीवनगौरवः मंजुषा कन्वर (बॅडमिंटन), विनीत कुमार शर्मा (हॉकी), कविता सेल्वराज (कबड्डी)